पुढारी

संक्षिप्त



इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये सायबर जागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांसाठी सायबर जागृती उपक्रम

**बारामती :** बारामतीतील इरा इंटरनॅशनल स्कूल येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाअंतर्गत पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विद्या प्रतिष्ठानच्या सानिका कापसे व वृषाली शिंदे या विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेविषयी माहितीपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये सायबर हल्ले म्हणजे नेमके काय, त्यापासून कसे वाचावे, आणि डिजिटल माध्यमात सुरक्षित कसे राहावे याविषयी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका वृषाली जगताप यांनी विद्यार्थिनींचे कौतूक केले. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेतून साकारलेली ही सायबर जागृती इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरावी, अशी प्रतिक्रिया उपस्थित शिक्षकांनी दिली.